महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/२१७९२
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०८/०९/२०१७

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवापुस्तिकेची छायांकीत प्रत देण्याबाबत.

------------

महावितरण कंपनीतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाकाळातील सेवाविषयक बाबींच्या नोंदी संबंधीत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत घेण्यात येतात. तसेच या नोंदी कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत वेळोवेळी अद्ययावत करण्यात येतात व कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवापुस्तक बंद करण्यात येते.

२. महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तिकेची छायांकीत प्रत संबंधीत कर्मचाऱ्यास देणे ही बाब कंपनीच्या विचाराधीन होती. याबाबत सक्षम अधिकारी यांनी मंजुरी दिली असून, महावितरण कंपनीतील जे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांचे कायदेशीर वारस सेवापुस्तिकेच्या छायांकीत प्रतीची लेखी स्वरुपात मागणी करतील, अशा सर्व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना संबंधीत सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तिकेची छायांकीत प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी. तसेच ही प्रत संबंधीत कर्मचारी ज्या कार्यालयामधून सेवानिवृत्त झाला आहे, त्या कार्यालयामार्फत पुरविण्यात यावी व छायांकीत प्रत प्राप्त झाल्याची नोंद कार्यालयात ठेवावी.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

८/९/१७

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)